MHNS140004262026

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३६/२०२६
अजरोदीन मोहमंद सादिक शेख वि.
महाराष्ट्र शासन - पोलीस निरीक्षक,
दिंडोरी पोलीस स्टेशन.

## निशाणी क्र. १ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज पोलीस ठाणे दिंडोरी यांनी गु.र.क्र.५०/२०२६, भारतीय न्याय संहीता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१६(३), ३१७(२), ३(५) मध्ये जप्त केलेला गॅलक्सी/सॅमसंग कपंनीचा A-35 मॉडेलचा मोबाईल व ५००/- रुपये दराच्या ७२ नोटा एकुण ३६,०००/- रुपये (यापुढे सोईकरिता 'जप्त मोबाईल व जप्त रक्कम' असा उल्लेख) चा अंतरिम ताबा मिळावा याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, दिंडोरी पोलीस स्टेशनकडील गु.र.क्र.५०/२०२६ मध्ये सामनेवाले यांनी जप्त केलेला गॅलक्सी/सॅमसंग कपंनीचा A-35 मॉडेलचा, 350115574209252/35047040420957 आय.एम.ई.आय. असलेला मोबाईल हा अर्जदार यांचा मेव्हणा श्री. अयान मोहीनोदीन इद्रीसी यांच्या मालकीचा आहे. प्रस्तुत जप्त केलेला मोबाईल हा श्री. अयान मोहीनोदीन इद्रीसी यांच्या मालकीचा असुन सदर मोबाईल हा त्यांनी अर्जदारास भेट म्हणुन दिलेला असुन सदर मोबाईल तेच वापरतात. त्यामुळे ते सदर मोबाईलचे कायदेशिर मालक आहेत. प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त गॅलक्सी/सॅमसंग कपंनीचा A-35 मॉडेलचा, 350115574209252/ 35047040420957 आय.एम.ई.आय. असलेला मोबाईल व ५००/- रुपये दराच्या ७२ नोटा असे एकुण ३६,०००/- रुपये जप्त केलेला आहे. प्रस्तुत जप्त केलेला मोबाईल व जप्त रक्कम ही त्यांच्या मालकीची आहे. पोलीसांनी प्रस्तुत मोबाईल व रक्कम जप्त केल्यापासून ती पोलीस ठाण्यात जप्त आहे. त्यामुळे त्याचे नुकसान होण्याची अथवा चोरीस जाण्याचा संभव आहे. सबब, सदर जप्त मोबाईल व जप्त रकमेचा अंतरिम ताबा मिळण्याकरिता आदेश व्हावा अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे.

०३. प्रस्तुत अर्जातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. तपासी अंमलदार

आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे पाहिले. तपासी अंमलदार यांनी प्रस्तुत अर्जाकामी त्यांचे म्हणणे दिले असुन आरोपीने जप्त मोबाईलचा वापर गुन्हा करण्यासाठी केलेला असुन जप्त रक्कमबाबत आरोपीस विचारणा केली असता कोणतेही समर्थक उत्तर न देता उडवाउडवीची उत्तर देत असुन जप्त मोबाईल व जप्त रक्कम परत केल्यास त्याचा वापर तो पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्ह्यात करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, जप्त मोबाईल व जप्त रक्कम परत करण्यास हरकत घेतली आहे.

**०४.** विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे लेखी म्हणणे सदर अर्जाचे निशाणी क्र.१ वर सादर केले. त्यांनी नमुद जप्त मोबाईल अर्जदारास परत देण्यास हरकत घेतली आहे.

**०५.** अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने त्यांच्या कथनाच्या पुष्ठर्थ त्याचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.४ वर, नि.क्र.३ लगत एफ.आय.आर ची छायांकित प्रत, सदर मोबाईल खरेदी केल्याचे बिलाची छायांकित प्रत, अर्जदाराचे आधारकार्डची साक्षांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत. तसेच निशाणी क्र.५ वर अय्यान मोहिद्दीन ईदरीशी यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करुन जप्त मोबाईल हा त्यांच्या नावाने असुन जप्त मोबाईल हा त्यांचे दाजी अझरोद्दीन सादिक शेख यास देण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. सदर दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, जप्त मोबाईल हा अय्यान मोहिद्दीन ईदरीशी यांच्या नावावर असुन अय्यान मोहिद्दीन ईदरीशी यांनी जप्त मोबाईल अर्जदारास देण्यास काही एक हरकत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने मोबाईलबाबत प्रथमदर्शनी मालकी दर्शविणारा पुरावा आणलेला आहे. त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती सदर मोबाईलवर हक्क सांगत नाही. तसेच सदर मोबाईल मधील डाटा रिकव्हर करण्यासाठी दिला आहे व त्यासाठी सदर मोबाईलची गरज आहे असे तपासी अंमलदार यांचे म्हणणे नाही.

**०६.** मा. सर्वोच्च न्यायालयाने Sundarlal Ambalal Desai versus State of Gujarat (AIR 2003 S C 628), मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत अर्जदार हा सदर मोबाईलचा ताबा

मिळण्यास पात्र आहे, त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदर मुद्देमालावर हक्क सांगणारी व्यक्ती समोर आली नाही. सबब अर्जदार प्रस्तुत अंतरिम ताबा मिळण्यास पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दिंडोरी पोलीस स्टेशनकडील गु.र.क्र.५०/२०२६ मध्ये सामनेवाले यांनी जप्त केलेला अर्जदाराचे मालकीचा गॅलक्सी/सॅमसंग कपंनीचा A-35 मॉडेलचा मोबाईल व ५००/- रुपये दराच्या ७२ नोटा एकुण ३६,०००/- रुपयांचा अंतरिम ताबा अर्जदारास द्यावा. त्याकरिता अर्जदाराने रुपये ५०० च्या मुद्रांक शुल्कावर १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) रुपये किमतीचा इंडेमनिटी बॉण्ड भरुन दयावा.

३. प्रस्तुत गुन्हयाचे तपासी अंमलदार यांना असे आदेश देण्यात येतात की, सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देताना त्याची छायाचित्रे आणि पंचनामा तयार करावा. जप्त रक्कमेचा पंचनामा तयार करतांना नोटांचे नंबर व किती रुपयांची नोट आहे हे नमुद करावे आणि सदर पंचनामा मुळ खटल्याकामी दोषारोपपत्र दाखल करताना त्यासमवेत दाखल करावे.

४. अर्जदारास असेही आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत खटल्याचा निकाल होईपावेतो अर्जदाराने सदर मोबाईल कोणासही दान, गहाण, विक्री देवु नये किंवा नष्ट करुन नये आणि इतर कोणत्याही स्वरुपात बदल होईल अशी कोणतीही कृती या न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय करु नये.

५. संबंधीतांना सदर आदेशाबाबतचे पत्र अग्रेषीत करण्यात यावे.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2026.03.20 16:35:11 +0530

दिनांक २०/०३/२०२६

( एस. सी. निर्मळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दिंडोरी.